पीएनए/एमएसआय/एचएसजी/(टिसी)/
१४४४७/२०२०- २०२१
दिनांक :- २७/१०/२०२०

महाराष्ट्र शासन

सहकार व वस्त्रोद्योग विभाग

नोंदणीचे प्रमाणपत्र

या प्रमाणपत्राव्दारे प्रमाणित करण्यात येत आहे की,

यश्विन आनंद सहकारी गृहरचना संस्था मर्या.

स.नं. २४/३/१,२४/३/२,४/३/३,२४/४,२४/५अे,२४/५अे, २४/५बी, २४/६,२४/७अे,२४/७ बी, २४/७ सी/१ आणि २४/७ सी/२ मौजे सुस,ता.मुळशी, जि.पुणे.

ही संस्था महाराष्ट्र सहकारी संस्थांचे अधिनियम १९६० मधील (सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २४) कलम ९ (१) अन्वये नोंदण्यात आलेली आहे.

उपरिनिर्दिष्ट अधिनियमाच्या कलम १२(१) अन्वये व महाराष्ट्र सहकरी संस्थांचे नियम, १९६१ मधील नियम क्रमांक १०(१) अन्वये संस्थेचे

वर्गीकरण " गृहनिर्माण संस्था "

उपवर्गीकरण " भाडेकरु सहभागीदारी गृहनिर्माण संस्था "

सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था मुळशी (पौड) जि.पुणे. सत्यमेव जयते

(अरुण साकोरे)
सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था
ता. मुळशी (पौड), जिल्हा पुणे.

स्थळ : मुळशी (पौड)

दिनांक : २८/१०/२०२०

सहाय्यक निबंधक,सहकारी संस्था मुळशी (पौड) यांचे कार्यालय

मुळशी तालुका सहकारी देखरेख संघ ईमारत पौड ता.मुळशी जि.पुणे.

Email ID – arcsmulshi@gmail.com

229

जा.क्रं.पीएनए/एमएसआय/एचएसजी/(टीसी)/१४४४७/२०२०

दिनांक :- २८/१०/२०२०

ज्ञा प न :

यश्विन आनंद सहकारी गृहरचना संस्था मर्या. स.नं. २४/३/१,२४/३/२, ४/३/३,२४/४,२४/५अे, २४/५अे, २४/५ बी, २४/६, २४/७ अे,२४/७ बी, २४/७ सी/१ आणि २४/७ सी/२ मौजे सुस,ता.मुळशी, जि.पुणे. या संस्थेच्या वतीने मुख्य प्रवर्तक श्री.सर्वेश विलास जावडेकर, यांचेकडे मा.सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, मुळशी (पौड) ता. मुळशी जि.पुणे यांनी रितसर मंजूर केलेल्या पोट नियमांची एक प्रत आणि नोंदणीचे प्रमाणपत्र क्रमांक पीएनए/एमएसआय/ एचएसजी/ (टीसी)/ १४४४७/ २०२० दिनांक २८/१०/२०२० सोबत पाठविण्यांत येत आहे.

२/ या कार्यालयातील मुख्य लिपिक यांना सहाय्यक निबधक, सहकारी संस्था,मुळशी (पौड) ता.मुळशी जि.पुणे. यांचे वतीने पहिल्या साधारण सभेस उपस्थित राहण्याचे व त्या सभेच्या प्रतिवृत्तांताच्या प्रतिसह पोटनियमाच्या औपचारीक स्विकृतीचे निवेदन सादर करणे बाबत कळविणेत आले आहे.

३/ सदरची संस्था पुणे महानगर प्रदेश क्षेत्र विकास प्राधिकरण पुणे यांनी मंजूर केलेल्या बांधकाम आराखडयाप्रमाणे बिल्डींग एकुण २८४ गाळांच्या संख्ये इतक्याच गाळयांकरीताच सहकारी गृहरचना संस्था नोंदणी करण्यात येत आहे.

४/- पहिल्या साधारण सभेचे वेळी मंजूर केलेल्या पोटनियमाची औपचारिक स्विकृती केली पाहिजे व अशी सभा महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे नियम ५९ अन्वये नोंदणीचे दिनांका पासून तीन महिन्यांचे आंत बोलाविली पाहिजे.

५/ महाराष्ट्र मालकी हक्काच्या सदनिकांबाबत (त्या बांधण्यास प्रोत्साहन देणे,त्याची विक्री व्यवस्थापन, हस्तांतरण यांचे नियमन करणेबाबत)अधिनियम १९६३ चे कलम ११ (१) व त्याखालील नियम १९६४ चे नियम ९ मध्ये असलेल्या तरतूदीप्रमाणे विहित ४ महिन्यांच्या कालावधीच्या आंत प्रवर्तक (बिल्डर) यांनी जमीन व त्यावरील इमारतीचे रितसर हस्तांतरण संस्थेच्या नावे करणे बंधनकारक राहील. विहित मुदतीत प्रवर्तक (बिल्डर) यांनी कलम ११(१) व नियम ९ मध्ये असलेल्या तरतूदीमध्ये विहित मुदतीत संस्थेचे नावे जमीन व त्यावरील इमारतीचे हस्तांतरण संस्थेच्या नांवे न केल्यास अशा परिस्थितीत जमीन व त्यावरील इमारतीचे हस्तांतरण करुन घेण्यासाठी संस्थेस कलम ११ (३) मध्ये असलेल्या तरतूदीप्रमाणे मा.जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था,पुणे (ग्रामीण) पुणे पाहिला मजला महाराष्ट्र राज्य सहकारी संघ इमारत पुणे ५ बी.जे.रोड पुणे. यांचेकडे अर्ज सादर करण्याची मुभा राहील.

सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था मुळशी (पौड) जि.पुणे. सत्यमेव जयते

(अरुण साकोरे)
सहाय्यक निबंधक,
सहकारी संस्था,मुळशी (पौड) जि.पुणे

प्रति:

१. श्री.सर्वेश विलास जावडेकर, यश्विन आनंद सहकारी गृहरचना संस्था मर्या. स.नं. २४/३/१,२४/३/२, ४/३/३, २४/४,२४/५अे, २४/५अे, २४/५बी, २४/६, २४/७ अे, २४/७ बी, २४/७ सी/१ आणि २४/ ७सी /२ मौजे सुस ता.मुळशी, जि.पुणे.

२. श्री.यु. एल,धुमाळ मुख्य लिपिक, अधिन सहाय्यक निबंधक,सहकारी संस्था, मुळशी (पौड)

त्यांना कळविण्यांत येते की, पहिल्या साधारण सभेस उपस्थित राहून प्रतिवृत्तांताच्या दोन प्रतींसह अहवाल या कार्यालयास सादर करावा.